पनवेल (प्रतिनिधी) सरकारी रूग्णालयांप्रमाणे सिडको हद्दीत विविध ठिकाणी रूग्णालयांची आवश्यकता लक्षात घेवून त्यासंदर्भात आपण सिडकोकडे मागणी व सातत्याने पाठपुरावा केला होता. सिडकोने या महत्वपूर्ण मागणीचा विचार करून रूग्णालयांच्या उभारणीसाठी मान्यता दिली असून लवकरच सिडकोच्या माध्यमातून कामोठे तसेच इतर नोडमध्ये प्रशस्त व सर्व सोयीयुक्त रूग्णालय उभे राहणार असल्याची माहिती आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज (शनिवारी) कामोठे येथे दिली.

सुवर्ण जयंती राजस्व अभियानातंर्गत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि पनवेल तालुका महसूल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कामोठे येथे विविध शासकीय दाखले वाटप शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबीराचे उदघाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते. कामोठे सेक्टर ०६ ए मधील रयत शिक्षण संस्थेच्या न्यु इंग्लिश स्कुलमध्ये झालेल्या या शिबीराच्या माध्यमातून उत्पन्न, स्थानिक वास्तव्य, रेशन कार्ड, जातीचा दाखला, ज्येष्ठ नागरिक कार्ड देण्यात येणार असून यावेळी मतदार नोंदणीचा कार्यक्रमही घेण्यात आला.

आमदार प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले की, दहावी-बारावीचे निकाल लागल्यानंतर विद्यार्थ्यांची पुढील वर्गात प्रवेश घेण्याकरिता अत्यावश्यक असलेल्या विविध दाखल्यांसाठी धावपळ होत असते. अशातच तहसिल कार्यालयात अर्ज जमा करणे किंवा दाखले घेण्यासाठी एकच गर्दी होते. त्यामुळे मनुष्यबळ कमी पडून कार्यालयावर कामाचे व्याप वाढते व दाखले मिळण्यास उशीर होत असतो. अर्ज केल्यानंतर पुन्हा त्यातील त्रुटी दूर करण्यासाठी ते दाखले मिळेपर्यंत फेऱ्या माराव्या लागतात. अशा परिस्थितीत एकाच ठिकाणी त्या-त्या संदर्भातील दाखले मिळणे ही अत्यंत सोयीस्कर बाब आहे. त्यामुळे धावपळ, वेळ व पैशाची बचत होते. अशा शिबीरांच्या माध्यमातून लोकांना सहजतेने दाखले मिळणार असल्याने अशा शिबीरांचे आयोजन शैक्षणिक व सामजिकतेच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे, असेही आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.

सिडकोच्या हद्दीतील पसिरांचा विकास करण्याचे नियोजन सिडकोकडे असतानाही त्याकडे सिडको दुर्लक्ष करीत आली असल्याने पायाभूत सुविधांचे प्रश्न नागरिकांना भेडसावत आहेत. हे सर्व प्रश्न सोडवून न्याय मिळवून देण्यासाठी कॉंग्रेस पक्ष कटीबध्द असून गरज पडल्यास आंदोलने करून न्याय मिळवून देण्याचे कामही कॉंग्रेस पक्ष सक्षमपणे करीत आला आहे. नुकताच सिडकोमध्ये घेतलेल्या बैठकीत कामोठे करिता कुस्ती आखाडा, मैदानांचा विकास करण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्याचे सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक संजय भाटिया यांनी मान्य केले असल्याचेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

या शिबीरास प्रमुख पाहुणे म्हणून प्रांताधिकारी सुदाम परदेशी, तहसीलदार पवन चांडक, निवासी नायब तहसीलदार अधिक पाटील, नायब तहसीलदार उमेश पाटील, पनप शिक्षण मंडळाचे सभपाती वाय. टी. देशमुख, तालुका कॉंग्रेसचे उपाध्यक्ष तथा कामोठे निरिक्षक के. ए. म्हात्रे, खनिदार डॉ. अरूणकुमार भगत, अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश विनेदार, जिल्हा कॉंग्रेसचे उपाध्यक्ष सुदाम पाटील, महिला तालुकाध्यक्षा ॲड. आशा भगत, कार्याध्यक्षा रत्नप्रभा घरत, युवक कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष अमर पाटील, कामोठे कॉंग्रेसचे अध्यक्ष गोपीनाथ गोवारी, कार्याध्यक्ष सुधाकर पाटील, जगन पावणेकर, विठुशेठ गोवारी, महिला तालुका उपाध्यक्षा माया आहिरे, कामोठ महिला अध्यक्षा दिक्षा जगताप, युवा नेते हॅप्पी सिंग, बबलु गोवारी, बबन गडवे, रमेश तुपे, दिनेश शिरसाट, रविंद्र गवळी, संजय म्हात्रे, नानोशी ग्रामपंचायतीचे सरपंच प्रकाश पाटील, स्त्रीशक्ती महिला मंडळाच्या अध्यक्षा स्वप्नाली म्हात्रे, धनाजी म्हात्रे, हरिभाऊ डोक, सचिन गायकवाड, अमित रोकडे, सतिश चौतमोल, रोहित घाडगे, पुजा तेली, अमित जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

**परिक्षांचा निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांना शालेय प्रवेशासाठी लागणाऱ्या दाखल्यांसाठी घाई -गडबड आणि एकच गर्दीला सामोरे जावे लागते. अशावेळी पाल्य, पालक आणि तहसिल कार्यालय यांच्या कामावर फार मोठा ताण पडतो. या सर्वांचा वेळ, धावपळ तसेच पैसे वाचविण्याच्या दृष्टीने आणि शासनाच्या उपक्रमामध्ये सहभाग घेवून लोकांची मदत करण्याचे काम श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व पनवेल तालुका महसूल विभाग यांनी केला असून हा अत्यंत स्त्युत्य उपक्रम आहे. -प्रांताधिकारी सुदाम परदेशी**